## रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत वकील पॅनेल गठीत करणेसाठी इच्छुक वकीलांकडून अर्ज मागणी

## जाहिरात क्रमांक रजिप/साप्रवि/लेखा ३/२२१२/२०२४, दिनांक-२६/०८/२०२४

जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत वकील पॅनेल गठीत करणेसाठी इच्छुक व पात्र वकीलांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. (वकील पॅनेलचे जाहिरातीसाठी प्रतिसाद म्हणून येणाऱ्या अर्जांची छाननी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखालील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) आणि ग्रामपंचायत/ आरोग्य/ बांधकाम/ शिक्षण पैकी एक जिल्हा परिषद खाते प्रमुख, जिल्हा शासकिय अभियोक्ता, आणि जिल्हयातील बार कौन्सिलचे एका प्रतिनिधीचा समावेश असलेल्या समितीचे शिफारशीने प्राप्त वकील पॅनेल प्रस्तावाला मान्यता स्थायी समिती मार्फत देणेत येईल.

२) इच्छुक व पात्र वकीलांनी विहीत नमुन्यातील अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद मुख्यालय, जिल्हा परिषद रत्नागिरी या पत्त्यावर पोष्टाने अथवा समक्ष जमा करावेत.

३) खालील दर्शविल्याप्रमाणे पाच स्वतंत्र वकील पॅनल राहतील.

अ) मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांसाठी वकील पॅनेल.

ब) मा. उच्च न्यायाल मुंबई/ मा. उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठ/मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकारण मधील प्रकरणांसाठी वकील पॅनेल.

क) मा. दिवाणी जिल्हास्तर न्यायालय/ मा. कामगार न्यायालयातील प्रकरणांसाठी वकील पॅनेल.

ड) मा. औदयोगिक न्यायालय कोल्हापूर येथील प्रकरणांसाठी वकील पॅनेल.

इ) मा. दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालयातील प्रकरणांसाठी वकील पॅनेल (रत्नागिरी वगळता उर्वरीत तालुक्यांसाठी).

४) अर्जदाराकडे वकीली करणेसाठीची सनद असणे आवश्यक राहील.

५) किमान पाच वर्षे वकील व्यवसाय केलेल्या व्यक्तींचाच पॅनेलमध्ये समावेश केला जाईल.

६) अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिवशी अर्जदाराचे वय ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

७) जिल्हा परिषद रत्नागिरी मध्ये वकील पॅनेलवर पूर्वी काम केलेल्या वकीलांना त्यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने लढविलेल्या एकूण न्यायालयीन प्रकरणांपैकी जिल्हा परिषदच्या बाजूने निकाल लागलेल्या प्रकरणांचे प्रमाण विचारात घेवून प्राधान्य दिले जाईल.

८) जिल्हा परिषदेच्या वतीने प्रकरणे लढविणेबाबत वकीलांची फी व इतर व इतर आकार खालीलप्रमाणे मान्यतेस्तव सादर

| ८(१) वकील फी प्रती न्यायालयीन प्रकरण (कोर्ट फी,बॉंड, स्टँम्प खर्च, साक्षीदार फी वगळता इतर सर्व खर्च मिळून या खर्चात न्यायालयीन प्रकरणी सुनावणीसाठी उपस्थित राहणेसाठीचा प्रवास खर्चदेखील समाविष्ठ आहे. | न्यायालयाचा प्रकार | पुर्वीचे वकील फी (रक्कम रुपये) | प्रस्तावीत वकील फी (रक्कम रुपये) | पॅनेलवरील कमाल वकील संख्या |
|---|---|---|---|---|
| | अ) मा.सर्वोच्च न्यायालय | ७५,०००/- | ७५,०००/- | ५ |
| | ब) मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपिठ/मा.महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकारण | २५,०००/- | २५,०००/- | १० |
| | क) मा.दिवाणी जिल्हास्तर न्यायालय/ कामगार न्यायालय | १५,०००/- | १५,०००/- | १० |
| | ड) मा. औदयोगिक न्यायालय कोल्हापूर | १५,०००/- | १५,०००/- | ४ |
| | ई) मा. दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय (तालूका स्तर पॅनेल) | १५,०००/- | १५,०००/- | प्रतितालुका २ (रत्नागिरी वगळता इतर तालुक्यासाठी) |

८(२) वर सर्व स्तराकरीता निश्चित करणेत आलेल्या दराव्यतिरिक्त वरील अ आणि ब साठी नियुक्त वकीलांनी अपवादात्मक प्रकरणी अधिक फी ची मागणी केलेस सदर प्रकरणातील गुंतागुंत, क्लिष्टता, गांभीर्य व महत्व विचारात घेऊन स्थायी समिती समोर आणून स्थायी समितीचे मान्यतेने वाढीव फी मंजूर करता येईल.

८(३) जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांना त्यांचे कार्यालयीन कर्तव्याबाबत प्रतिवादी केले असल्यास आणि त्यामुळे एकाच न्यायालयात प्रकरणात जिल्हा परिषद अधिनस्त प्रतिवादींची संख्या एकापेक्षा अधिक झाल्यास त्या सर्वांचे वतीने परिषद नियुक्त वकीलाला एका न्यायालयीन प्रकरणाचे फी मध्ये एकत्रित प्रकरण मा. न्यायालयात चालवावे लागेल. प्रत्येक प्रतिवादीसाठी स्वतंत्र फीचा विचार केला जाणार नाही.

८(४) जिल्हा परिषद अथवा जिल्हा परिषद अधिनस्त पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांना त्यांच्या कार्यालयीन कर्तव्याबाबत प्रतिवादी केलेली एकसारखीच अनेक प्रकरणे असल्यास ती एकत्र करुन पॅनेलवरील एकाच वकीलाकडे देता येतील तथापी अशा प्रकरणी खालील विगतवारीनुसार वकील फी आदा करता येईल.

| | | |
|---|---|---|
| १ | एकाच प्रकारची २ प्रकरणे | जि.प.ने एका केससाठी निश्चित केलेल्या वकील फी च्या दराने |
| २ | एकाच प्रकारची ३ ते ५ प्रकरणे | जि.प.ने एका केससाठी निश्चित केलेल्या वकील फीच्या दुप्पट दराने |
| ३ | एकाच प्रकारची ६ ते १० प्रकरणे | जि.प.ने एका केससाठी निश्चित केलेल्या वकील फीच्या तिप्पट दराने |
| ४ | एकाच प्रकारची ११ ते १५ प्रकरणे | जि.प.ने एका केससाठी निश्चित केलेल्या वकील फीच्या चौपट दराने |
| ५ | एकाच प्रकारची १६ ते २० प्रकरणे | जि.प.ने एका केससाठी निश्चित केलेल्या वकील फीच्या पाचपट दराने |
| ६ | एकाच प्रकारची २१ व त्यापेक्षा अधिक प्रकरणे | जि.प.ने एका केससाठी निश्चित केलेल्या वकील फीच्या सहापट दराने |

८(५) एकूण वकील फीचे पुढे नमुद केलेप्रमाणे तीन टप्प्यांत प्रदान अनुज्ञेय राहील.

४०% न्यायालयात वकील हजर होवून कैफियत (Written Statement) दाखल झाल्यावर ४०% जिल्हा परिषदेचे वतीने पुरावे दाखल झालेवर आणि युक्तीवादाचा (Argument) टप्पा पूर्ण झाल्यावर, २०% निकाल झाल्यावर मात्र त्याचे मुळ निकालपत्राची न्यायालयीन प्रत प्राप्त झाल्यावर तथापी, कोर्ट फी/स्टँप/बॉंड खर्च व एका स्तरावरुन दुसऱ्या स्तरावर केस

चालविणेस प्रशासनाने मान्यता दिली असलेस विहित दराने प्रवास खर्च तसेच साक्षीदार फी वगैरे इतर अनुज्ञेय खर्चाचे प्रदान वेळोवेळी करता येईल.

८(६) प्रत्येक न्यायालयीन प्रकरणी ठरविलेली फी विहीत पध्दतीने देणेबाबत जिल्हा परिषदेतर्फे प्राधान्याने कार्यवाही करणेत येईल. मात्र अनुदान उपलब्धतेनुसार वकील फी अदायगी करणेत येईल.

८(७) न्यायालयीन प्रकरणाचा निकाल केव्हाही लागत तरी ज्या कालावधीत न्यायालयीन प्रकरण वकीलाकडे सोपविले गेले त्या कालावधीतील दर लागू राहतील.

९) जेव्हा जिल्हा परिषदेला एखाद्या प्रकरणी कायदेविषयक लेखी सल्ला/मत आवश्यक वाटेल तेव्हा त्यासाठी संबंधीत वकीलास प्रति प्रकरण रुपये ७००/- मर्यादेत फी आदा करता येईल.

१०) जिल्हा परिषदेच्या न्यायालयात एखाद्या प्रकरणी कॅव्हेट दाखल करायचे झाल्यास त्याबाबत वकीलांना खालील प्रमाणे फी आदा करता येईल.

| न्यायालयाचा प्रकार | रक्कम रुपये |
|---|---|
| अ) मा. सर्वोच्च न्यायालय | रक्कम रुपये २०,०००/- |
| ब) मा. उच्च न्यायाल मुंबईचे औरंगाबाद खंडपीठ/ मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण | रक्कम रुपये ८०००/- |
| क) मा. दिवाणी जिल्हा स्तर न्यायालय/ मा. दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय/ मा. कामगार न्यायालय/ मा. औदयोगिक न्यायालय | रक्कम रुपये ५०००/- |

११) पॅनल वरील वकीलांना रोटेशन प्रकरणे देणे अपेक्षित राहील. तथापी खालील प्रकरणी रोटेशनचा अपवाद करुन प्रकरण देता येईल.

क) खालच्या कोर्टात वकीलांनी जिल्हा परिषदेचे बाजूने केस जिंकली असल्यास आणि त्या प्रकरणात अपील झाल्यास सदर अपिलात जिल्हा परिषदेचे वतीने खालच्या कोर्टात काम पाहिलेल्या वकीलांना ती केस देता येईल.

ख) तालुक्याच्या मुख्यालयी असलेल्या न्यायालयातील केस असल्यास त्या तालुक्यातील पॅनेलवरील वकील देता येतील.

ग) जेथे शासन देखील प्रतिवादी असेल तेथे शासकिय वकील जिल्हा परिषदेचे वतीने देखील काम पाहणेस तयार असेल तेथे शासकिय वकीलांची सहमती असल्यास त्यांचेकडे जिल्हा परिषदेचे वतीने काम पाहणेसाठी प्रकरण सोपविता येईल.

घ) राज्यात इतर जिल्हयात जिल्हा परिषदेला प्रतिवादी करण्यात आले असेल तर त्या संबंधीत जिल्हा परिषदेच्या वकील पॅनेलवरील वकीलांना जिल्हा परिषद रत्नागिरीच्या बाजू मांडणेकरीता वकीलपत्र देता येईल. तसेच त्या जिल्हा परिषदेने निश्चित केलेल्या दराने प्रदान करण्यास मुभा राहील.

च) प्रकरणांची गुंतागुंत, क्लिष्टता, गांभिर्य व महत्व लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे रोटेशन बाहेर जावून वकील देऊ शकतील.

१२) वकील पॅनल कालावधी हा त्याबाबतचे आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ३ वर्षे राहील. तथापि, त्यांनतर नवीन वकील पॅनल गठीत होईपर्यंत पूर्वीचे वकील पॅनेल कार्यरत राहील. वकील पॅनेलचा कालावधी वाढविणे किंवा मुदतीपूर्वी वकील पॅनेल बरखास्त करणेचा अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला राहील.

१३) नवीन गठीत पॅनेलमध्ये ज्या वकीलांचा समावेश नाही मात्र त्यांचेकडे पूर्वीच जिल्हा परिषदेची न्यायालयीन प्रकरणे सोपविली असतील तर त्या प्रकरणांचा निकाल लागेपर्यंत त्या वकीलांनी त्या प्रकरणाचे काम पहावयाचे आहे.

१४) वकील पॅनेलवरील नियुक्त वकील जिल्हा परिषदेची बाजू समर्थपणे मांडत नसलेची किंवा मांडलेली नसलेली बाब निदर्शनास आलेस सदर वकीलाची वकील पॅनेलवरील नियुक्ती मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद यांच्या सहमतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रद्द करु शकतील.

१५) जिल्हा परिषद नियुक्त वकील पॅनेल मधील वकीलांना कोणत्याही न्यायालयीन प्रकरणी जिल्हा परिषद विरुध्द केस चालविणेस घेता येणार नाही व अशी बाब निदर्शनास आलेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे त्यांची वकील पॅनेलवरील नियुक्ती संपुष्टात आणू शकतील.

१६) वकील पॅनलवरील नियुक्त वकीलानी दिलेली केस नाकारलेस त्याऐवजी पुढील रोटेशनपर्यंत केस दिली जाणार नाही. तसेच नियुक्त वकीलाने सतत तिसऱ्यांदा केस नाकारलेस त्यांना केसेस देणे बंद करता येईल व त्यांना नोटीस देऊन त्यांची नियुक्ती संपुष्टात आणणेची कार्यवाही करता येईल.

१७) अध्यक्ष, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी/अति. मुख्य कार्यकारी अधिकारी न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा करणेचे कामी ज्या सभा बोलावतील त्या सभांना जि.प.पॅनेलवरील नियुक्त वकीलांनी स्वत: उपस्थित राहुन त्यांचेकडील दिलेल्या न्यायालयीन प्रकरणावरील कार्यवाहीच्या सद्य:स्थितीची सविस्तर माहिती देणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

१८) अर्ज स्विकृती कालावधी, अर्जांची छाननी करणेचा दिनांक व अर्ज पात्र/अपात्र घोषित करणेचा कालावधी

| अर्ज स्वीकृती कालावधी | अर्जांची छाननी करणेचा दिनांक | अर्ज पात्र/अपात्र घोषित करणेचा दिनांक | स्थायी समितीचे मान्यतेसाठी शिफारस करणेचा कालावधी |
|---|---|---|---|
| दिनांक ११/०९/२०२४ पर्यंत | दि. २०/०९/२०२४ | दिनांक २४/०९/२०२४ | दि. २४/०९/२०२४ नंतरची स्थायी समिती |

१९) पोष्टाने पाठविलेले अर्ज रजिस्टर्ड पत्र पोचपावतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद रत्नागिरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषद भवन,रत्नागिरी - ४१५६१२ या पत्त्यावर पाठविले जावेत. लिफाफ्यावर जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत नवीन वकील पॅनेलवरील नियुक्तीसाठीचा अर्ज असे लिहून ज्या स्तरासाठी अर्ज केला आहे त्या स्तराचे नाव लिहावे. अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत प्राप्त झालेले अर्जच फक्त स्विकारले जातील, त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पोष्टाचे झालेल्या विलंबाबद्दल हे कार्यालय जबाबदार असणार नाही. आलेल्या अर्जांपैकी पात्र/अपात्र अर्जांची यादी वरील दिलेल्या तक्त्यामधील दिनांकास

जिल्हा परिषद कार्यालयाचे सूचना फलकावर घोषित केली जाईल. याबाबत अर्जदाराचे काही आक्षेप असल्यास ते त्यानंतरच्या दोन दिवसात सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० या वेळेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेकडे नोंदविणेचे आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी तात्काळ अशा अक्षेपाबाबत निर्णय द्यावयाचा आहे.

इच्छुक व पात्र वकीलांनी अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती सादर कराव्यात.

१. विधी व न्याय पदवीचे प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत.

२. सनदेची प्रत.

३. वयाचे पृष्ठयर्थ स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्मदाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/ शालांत परिक्षा प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत.

४. किमान पाच वर्षे वकील व्यवसाय केलेचे पुरावा पृष्ठयर्थ न्यायालयाकडील दाखला / प्रमाणपत्र.

(किर्ती किरण पुजार, भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

# अर्जाचा नमुना

जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत नवीन वकील पॅनेलवरील नियुक्तीसाठीचा अर्ज

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक

| स्तर | अर्ज स्वीकृती केंद्राचे नांव | अर्जाचा क्रमांक |
|---|---|---|
| | | |

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद रत्नागिरी

इच्छुक व पात्र वकीलांनी येथे आपले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र लावावे.

विषय :- जिल्हा परिषद रत्नागिरी वकील पॅनेलवरील नियुक्ती सन २०२४अंतर्गत --------------------------- या स्तरासाठी अर्ज.

१) संपूर्ण नांव -

| नांव | वडीलांचे/ पतीचे नांव | आडनांव |
|---|---|---|
| | | |

अर्जदार विवाहित महिला वकील असेल तर विवाहापूर्वीचे नांव

| नांव | वडीलांचे/ पतीचे नांव | आडनांव |
|---|---|---|
| | | |

२) पत्रव्यवहाराचा पत्ता -

-------------------------------------------------

-------------------------------------------------

--------------------------------------------------

पिन कोड क्रमांक -------------------------------

मुळ राहण्याच्या ठिकाणाचा पत्ता

---------------------------------------------------------

---------------------------------------------------------

---------------------------------------------------------

पिनकोड क्रमांक -----------------------------------------

३) अर्जदार वकीलांचा ई-मेल आय डी ---------------------------------------------------------------------

४) अ) दूरध्वनी क्रमांक ------------------------------------ ब) भ्रमणध्वनी क्रमांक --------------------------------

५) अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

(अर्ज स्विकारणेच्या शेवटच्या दिनांकास अर्जदाराचे वय)

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

जन्मतारीख अक्षरी ---------------------------------------------------------------------------------------------

६) सनद घेतल्याची तारीख :-

७) मा. दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालयासाठी (तालुकास्तर पॅनलसाठी अर्ज) :- ----------------------------------------
असलेस कोणत्या कनिष्ठ स्तर न्यायालयासाठी तो तालुका नमुद करावा.

८) वकील व्यवसायाचा कालावधी/अनुभव

| अ.क्र. | वकील व्यवसाय केलेल्या न्यायालयाचा प्रकार | वकील व्यवसायाचा कालावधी (कोणत्या वर्षापासून कोणत्या वर्षापर्यंत) | वकील व्यवसायाचा एकूण कालावधी (वर्ष - महिने) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| | | | |

९) अर्जदार वकीलांची शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठाचे/मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | वर्ग/श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | विधी व न्याय/विधीस्नातक पदवी | | | |
| २ | पदवी/ पदव्युत्तर | | | |
| ३ | इतर अर्हता | | | |
| ४ | | | | |

१०) अर्जदार सादर करु इच्छित असलेल्या इतर उल्लेखनीयबाबी

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

११) अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रति जोडलेल्या आहेत. होय/नाही (चौकटीत लिहावे)

| | |
|---|---|
| १. विधी व न्याय पदवीचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| २. सनदेची प्रत | |
| ३.वयाचे पृष्ठयर्थ स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्मदाखला/शाळा सोडल्याचा दाखला/शालांत प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत | |
| ४. किमान पाच वर्षे वकील व्यवसाय केलेचे पुरावा पृष्ठयर्थ न्यायालयाकडील दाखला/ प्रमाणपत्र | |
| ५. इतर शैक्षणिक अर्हतेची प्रती | |

## **प्रतिज्ञापत्र**

मी असे प्रमाणित करतो/ करते की, रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत नवीन वकील पॅनेल गठीत करणेसंबंधी प्रसिध्द केलेली जाहिरात मी काळजी पूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच मी असे प्रमाणित करतो/करते की अर्जामध्ये दिलेली माहिती खरी आहे. त्यापृष्ठयर्थ मी प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. तसेच असे प्रमाणित करतो/ करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझी रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत गठीत वकील पॅनेलवरील नियुक्ती रद्द होईल व रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत गठीत वकील पॅनेलवरती हक्क राहणार नाही. याची मला जाणीव आहे. याबाबत जिल्हा परिषद अंतर्गत शिफारस करणेसाठी नियुक्त समिती तसेच स्थायी समिती, जिल्हा परिषद रत्नागिरीचे निर्णय माझ्यावर बंधनकारक राहिल. याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

वकीलांची स्वाक्षरी

नांव :-

स्थळ :-

दिनांक :-